Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/25040401V13P0013

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Apr'25
Issue–IV(I), Volume–XIII

# अस्पृश्योधार चळवळीतील सर्वश्रेष्ठ समाज प्रवर्तक - डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**प्रा. नरेंद्र विश्वनाथ झाडे**
इतिहास विभाग
श्री गोविंदप्रभु महाविद्यालय तळोधी बाळापूर , जि. चंद्रपुर

**डॉ. रूपेश एम. मेश्राम**
सहायक प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
ब्रम्हपुरी, जि. चंद्रपुर

**प्रस्तावना :**— डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना संपूर्ण भारतीय समाजाच्या क्रांतीची आस होती. अस्पृश्यता हा केवळ अस्पृश्यांचाच नव्हे तर सर्व हिंदू समाजाचा, भारताचा राष्ट्रीय प्रश्न मानला पाहिजे हा त्यांचा आग्रह होता. त्यामुळे अस्पृश्योध्दार हा त्या व्यापक समाजपरिवर्तन प्रक्रियेचा एक अटळ भाग म्हणूनच त्याकडे ते पाहत होते. 'अस्पृश्यांनीच अस्पृश्योध्दाराची चळवळ हाती घेवून स्पृश्योधाराचीही चिंता वाहने ही घटना हिंदूच्याच नव्हे तर एकुण मानवी इतिहासातही अपूर्व अशीच आहे. त्यासाठी बहिस्कृत भारताचे लेख सर्वात आधी ब्राह्मणांनी अवश्य वाचले पाहिजेत. अशी शिफारस करीत आहे'' असे ते म्हणाले होते.
डॉ. आंबेडकर म्हणतात – ''छत्रपती शाहु महाराजांच्या मते, ''स्वराज्य आम्हास पाहिजेच आहे, त्या योगे आमच्यात चैतन्य उत्पन्न होईल. परंतु जोपर्यंत आमच्यात जातीतील मतभेद आणि मत्सर जिवंत आहे तोपर्यंत आम्ही आपसात झगडत राहणार आणि आमच्या हितबुध्दीस अपाय करून घेणार. आमच्यातील अंतस्थ कलह नाहीसे करण्यास आणि आम्हाला स्वराज्यास पात्र करून घेण्याकरिता ही अनर्थकारी जातिपध्दती झुगारून देणे आम्हास अत्यंत आवश्यक आहे. जर हल्लीची जातिव्यवस्था कायम राहिली तर ज्या रीतीने हल्ली स्वराज्याचा अर्थ समजला जातो ते स्वराज्य म्हणजे मूठभर लोकांच्या हाती सत्ता जाणे हे होईल. याचा अर्थ मी स्वराज्य चळवळीच्या विरूध्द आहे असा समजायचा नाही. केवळ सत्ता उच्चवर्गीयाच्या हातातच जाण्यात स्वराज्याचे पर्यवसान होऊ नये. असे आम्हास वाटते.''

**अस्पृश्योधार चळवळ :** 1924 हे भारताच्या इतिहासातील एक महत्वाचे वर्ष गणले गेले कारण त्यावर्षी तीन प्रचंड शक्ती भारताच्या सामाजिक क्षेत्रात अवतरल्य ा– वि. दा. सावरकर, मोहनदास गांधी आणि डॉ. आंबेडकर.

''राजकीय गुलामगिरीपेक्षा सामाजिक गुलामगिरी अधिक भिषण आहे'' असे प्रामाणिक पणे मानणारे पुढारी त्यावेळी होते. हिंदु महासभेचे गणमान्य नेते डॉ. पी. वरदराजलू नायडू म्हणाले होते, ''ब्रिटिश साम्राज्यवादाने आमची शरीरे गुलाम केली, परंतु ब्राह्मणशाहीने आमच्या आत्म्यालाच गुलाम केले आहे''[1]

शेकडो वर्षाच्या सामाजिक गुलामगिरीतुन ब्रिटिश राज्यकर्त्यांनी ब्राह्मणेतरांची मुक्तता केली. त्यामुळे ब्रिटिशांविषयी कृतज्ञतेची भावना सत्यशोधकांच्या मनात होतीच.

डॉ. भांडारकर म्हणाले, At present, however, though we live under a foreign government, we enjoy a freedom of thoughts and action such as we never enjoyed before under our own Hindu

princes."शुद्र आणि अतिशुद्रांना ब्राह्मण नको होते, त्याचप्रमाणे इंग्रज राज्यकर्त्यांना ब्राह्मणांचे पुढारीपण नको होते. इंग्रज राज्यकर्त्यांना भीती वाटे ती फक्त ब्राह्मणांची. शुद्र आणि अतिशुद्रांपासून ब्रिटीशंना धोका नव्हता.[2]

जोतीबांना ब्राह्मणवर्गाचे पुढारीपण नको होते. त्यांच्या सत्यशोधक समाजाला नको होते, त्याचप्रमाणे इंग्रज सरकारलाही ते नकोच होते.

**अस्पृश्योध्दारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दलितोध्दाराची चळवळ हिंदू धर्म सुधारेपासून झाली. अनेक स्थित्यंतरानंतर डॉ. आंबेडकरही धर्माकडेच वळले. परंतु त्यासाठी त्यांनी सामाजिक अभिसरणाला प्रेरक अशा बुध्द धर्माचा स्विकार केला. हे लक्षणिय आहे.[3]

गुलामाची मुक्तता करण्यासाठी सामाजिक समता, न्याय, बंधुता ते सामाजिक अभिसरन परिवर्तनातील कळीचे मुद्दे होते. गुलामांची मुक्तता झाल्याशिवाय स्वातंत्र्याला अर्थ नसतो. म्हणून या कळीच्या मुद्दयांना ऐरणीवर आणणारा विचारवंत कार्यकर्ता व नेता तोच खरा स्वातंत्र्याचा जनक ठरतो. डॉ. आंबेडकरांची अस्पृश्योध्दाराची चळवळी ही स्वतःच्या अनुभवातून सुरू झाली होती. अस्पृश्यतेचा हा क्लेषकारी अनुभव त्यांच्या जीवनाला एक निश्चित दिशा तथा बौध्दिक व मानसिक उर्जा देणारा स्त्रोत होता. त्यांच्या सर्व भावी कार्याच्या प्रयोजनातून या अवमानित, व्यक्तिगत व सामाजिक स्वानुभूतीचे कंठ उफाळत राहिले होते. हे त्यांच्या बहिस्कृत भारतच्या 19 जुलै 1927 च्या अंकातील अग्रेलेखात त्यांनी स्पष्ट केलेले आहे.[4]

लाला लाजपत रॉय यांना डॉ.आंबेडकर म्हणाले होते, "तुम्ही स्पृश्य हिंदू आम्हा अस्पृश्यांना गुलामगिरीत ठेवून स्वातंत्र्य मिळवू पाहाता, पण यामुळे अस्पृश्य तुमच्या चळवळीत सामील होणार नाहीत." "अस्पृश्यांची ज्ञानलालसा उल्लेखनिय आहे, हे आंबेडकरांनी हेरले होते. म्हणून Educate, Organize, Agitate या त्यांच्या त्रिसुतीत प्रथम स्थान शिक्षणाला आहे. विद्या, प्रज्ञा, करूणा, मैत्री व शील यानुार प्रत्येकाने आपले जीवन जगले पाहिजे. शाळेत समबुध्दीचे उदात्त विचारांचे, निःपक्षपाती व थोर मनाचे शिक्षक पाहिजेत, असे त्यांचे ठाम मत होते.[5]

ब्राह्मणेत्तर सवर्णांची अस्पृश्याबद्दलची ब्राह्मण्यग्रस्त मानसिकता हिंदुत्व निष्ठांची मर्यादा, काँग्रेस व अन्य सवर्ण नेतृत्वाची अस्पृश्यांबद्दलची भूमिका व 1917 साली सरकारकडून घोषित झालेला राजकीय सुधारणांचा प्रस्ताव या सर्व बाबींचा एकत्रीत परिणाम म्हणजे शिक्षणाबरोबरच स्वतःच्या हक्कासाठी अस्पृश्यांमध्ये प्रबळ जाणिव निर्माण करण्याची आवश्यकता आहे याची जाणिव बाबासाहेबांच्या मनात निर्माण झाली.[6]

अस्पृश्य समाजातील लोकांमध्ये त्यांचा आत्मसन्मान जागविण्यासाठी त्यांनी त्यांच्या इतिहासापासून स्त्री जातीच्या प्रगतीपर्यंचा आलेख जागा केला. अस्पृश्यांना त्यांच्या सिंह राशिचा उल्लेख करून तत्कालीन परिस्थिती प्रमाणे रायगडावर 15 दिवस लढणारा रामनाक माहार (नागेवाडीचा) तर पेशव्यांना अखरेची मुठमाती देणारे भीमा कोरेगावच्या युध्दातील लढवय्ये वीर यांची आठवण करून देत होते. एखाद्या समाजातील स्त्रियांच्या प्रगतीवरून त्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करता येते. महाड परिषदेत म्हणाले की, तुमची लुगडी नेसण्याची पध्दती तुमच्या अस्पृश्यतेची साक्ष देते. गळयातल्या गळसऱ्या, कोपरापर्यंतच्या पाटल्या हया तुम्हाला ओळखण्याची खून आहे. दागिण्यापेक्षा कपडयातच जास्त शोभा येते. दागिना घालायचा तर सोन्याचाच घाला. आपल्या मुलींना शाळेत शिकवा व स्वतःही लिहायला/वाचायला शिका. मेलेल्या जनावंराचे मास खाणे बंद करा, नवऱ्याला दारू पिण्यापासून आवरा, त्याला घरात प्रवेश देवू नका.[7]

https://doi.org/10.69758/GIMRJ/25040401V13P0013

नाशिकच्या काळाराम मंदिराच्या सत्याग्रहाकडे बाबासाहेब सामाजिक समता संग्रामातील एक साधन म्हणून पहात होते. ते म्हणाले होते, ''आम्हाला माहीत आहे की मंदिरात दगडाचा देव आहे. त्याचे दर्शन झाल्याने व त्याची पुजा केल्याने आमचा प्रश्न सुटणार नाही. पण या मंदिर प्रवेशाने हिंदूच्या ह्रदयात अस्पृश्यांना प्रवेश मिळतो का हे आपण पाहत आहोत. हा लढा फक्त दलितांनाच लढावा लागला.[8]

13 ऑक्टोबर 1935 ला येवला येथे झालेल्या प्रसिध्द परिषदेत त्यांनी धर्मांतराची घोषणा केली. आपला जन्म दुर्दैवी असल्याची खंत व्यक्त केली. भूतकाळ आपल्या हाती नव्हता. परंतु वर्तमान आपल्या हाती आहे त्या आधारे भविष्य घडविता येते यावर त्यांचा ठाम विश्वास होता.[9]

हिंदू समाज हा धर्माधिष्ठित समाज आहे त्यामुळे विषमतेचे मूळ हे धर्मातच आहे नव्हे त्याचा धर्मच आहे. या खात्रीमुळेच हिंदूधर्म त्यागण्याची त्यांनी घोषणा केली. सायमन कमिशनकडे साक्ष देतांना अस्पृश्यांना हिंदूमध्ये समाविष्ठ न करता स्वतंत्र स्थान दयावे अशी मागणी त्यांनी केली होती.

27 डिसेंबर 1927 हा भारताच्या इतिहासातील अत्यंत अविस्मरणीय दिवस गणला गेला. मनुस्मृतीची होळी करून डॉ.आंबेडकरांनी खोटया देवतांना त्यांच्या पारंपारिक उच्च नि पूज्य स्थानावरून खाली ओढले होते. डॉ.आंबेडकरांनी केलेला हा मूर्तिभंजक हल्ला अहंकारी परंपरावाद्यांबरोर यापूर्वी कोणी केला नव्हता. महाड हे हिंदू मार्टिन ल्यूथरचे विटेनबर्ग ठरले.[10]

'अस्पृश्यता ही गुलामगिरी आहे. गुलामगिरी आणि धर्म एके ठिकाणी नांदू शकत नाही. आम्ही जे कार्य आरंभिले आहे ते स्वतःच्या उध्दारापुरते नसून हिंदू धर्माच्या उध्दारा करिता आहे. हेच खरे राष्ट्रकार्य आहे.' हे त्यांनी जाहीर केले.

हिंदू धर्मातील निरनिराळया जातींच्या पृथक्त्वामध्ये स्वार्थ रक्षणाची वृत्ती इतकी प्रकर्षाने जाणवते की जणू काही ती पृथक राष्ट्रेच आहेत. या जातिभावने विषयीच्या सर्वात अधिक चिंतेचे बाबासाहेबांच्या मनातील कारण म्हणजे या भावनेमुळे एकराष्ट्रियत्वाच्या जाणिवेसाठी आवश्यक असे समाज संघटन, समाजाची एकात्मता यांना बांधा येते.

पुरोहित हा ब्राम्हण जातीचाच असावा हया एका गोष्टीमुळे जातिभेदाना भयंकर स्वरूप प्राप्त झाले आहे. हे ऐतिहासिक सत्य आहे.

दुसरी बाब म्हणजे, ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर दोन्ही अस्पृश्यांच्या विरोधीच होते. याचा अनुभव डॉ. आंबेडकरांना बरेचदा आला होता. महाडच्या चवदास तळयाच्या पाणी पिण्या प्रकरणी मोर्चेकरांना जी मारहाण झाली त्यात मारहाण करणारे बहुसंख्य हे ब्राह्मणेतरच होते. अर्थात ते ब्राह्मणांच्या सांगण्यावरुनच घडले हे मात्र खरे. हे ब्राह्मणेतर लोक इतके आडमुठे आहेत की मारहाण करण्यास व बायकांची विटंबना करण्यास त्यांना काहीच वाटत नाही.[11]

**समाजप्रवर्तक डॉ. आंबेडकरांचे मूल्यमापन :–** कोलंबिया विद्यापीठात 5 जून 1952 रोजी. पदवीदान समारंभ झाला. त्या दिवशी 05 विश्वविख्यात गृहस्थांना डॉक्टर ऑफ लॉज ही बहुमानाची पदवी देण्यात आली. त्यात डॉ. आंबेडकर हे एकटेच भारतीय होते. त्यांना दिलेल्या सन्मानपत्रात नमुद केले होते की, ''भारतीय घटनेचे शिल्पकार, मंत्रिमंडळाचे सदस्य व राज्य सभेचे सदस्य भारतीय नागरिकांपैकी एक प्रमुख नागरिक, एक महान समाज सुधारक आणि मानवी हक्कांचा आधारस्तंभ असणारा एक पराक्रमी पुरूष.'' ही नोंद त्यांच्या मोठेपणाची साक्ष आहे.[12]

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Apr'25
Issue–IV(I), Volume–XIII
https://doi.org/10.69758/GIMRJ/25040401V13P0013

स्वतः उच्च विद्याविभूषित होवून आपल्या गुलाम समाजाची गुलामी नष्ट करून समानतेचा दर्जा प्राप्त करून देणारे डॉ. आंबेडकर जगविख्यात समाज प्रवर्तक होते. यात तिळमात्र शंका नाही. यापुढे जावून असेही मानले जाते की डॉ. बाबासाहेब आंबेडकर ते युगप्रवर्तक पुरुष आहेत. ते विश्वभूषण आहेत.

डॉ.आंबेडकरांनी समाज परिवर्तनाचे शस्त्र म्हणून शिक्षणाला अनन्य साधारण महत्व दिले. त्यासाठी पीपल्स एज्यूकेशन सोसायटीची स्थापना करून मुंबई, औरंगाबाद येथे कला, विज्ञान, वाणिज्य, अर्थशास्त्र, विधी महाविद्यालयाची सुरुवात केली. त्याच ठिकाणी विद्यार्थ्यांच्या निवाची सोय म्हणून वसतीगृह सुरु केले. सुसज्ज ग्रंथालयाची उभारणी केली. याच बरोबरीने विद्वान प्राध्यापक वर्ग निवडला.[13]

समाज प्रबोधनाचे माध्यम म्हणून वृत्तपत्रे सुरु केली. मुकनायक, बहिस्कृत भारत, समता, जनता, प्रबुध्द भारत इत्यादी प्रमुख होत. 4 जानेवारी 1925 ला अस्पृश्य वर्गातील शिक्षणाऱ्या मुलांच्या शिक्षणासाठी पाहिले मोफत वसतीगृह सुरु केले. 4 सप्टेंबर 1925 ला समाज समता संघाची स्थापना केली. पुढे 14 जुन 1928 ला भारतीय बहिस्कृत समाज शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेची निर्मिती केली. याशिवाय बहुजन हितकारिणी सभेची स्थापनाही केली. सरस्वती विकास नावाचे मासिकही त्याचवेळी सुरु केले. एक सार्वजनिक वाचनालय व महार हॉकी क्लब ही सुरू केले.[14]

मुंबई विधानमंडळात सभासद असतांना कमाल जमिन धारणा विधेयक, पोलीस सुधारणा कायदा, अस्पृश्यता निवारण इत्यादी प्रश्न लावून मंजूर करून घेतले. विधितज्ञ म्हून विधि कोर्टात स्वतः वकीलपत्र दाखल करून अनेक गरीबांना न्याय मिळवून दिला. अनेक ग्रंथाचे लेखन करून वास्तव जगापुढे मांडले.

इंग्रज सरकारच्या मंत्रीमंडळात मजूरमंत्री म्हणून काम करतांना त्यांनी केलेली कार्ये तर अजरामर आहेत. कामगारांचे हित लक्षता घेवून त्यांचे कामाचे तास, आठवडी सुटी, महिलांना पगारी प्रसूती रजा, कामगारांच्या मुलांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना, त्यांच्या निवासाची सोय या प्रमुख आहेत. शेती विकासासाठी धरण योजना व जलसिंचन, दामोदर व्हॅली योजना, विज निर्मिती केंद्राची उभारणी आणि विशेष बाब म्हणजे संतती नियोजनासाठी कुटूंब नियोजन योजना यांचा विशेष समावेश होतो. देशाचे स्वातंत्र्य अबाधित राहावे म्हून तयार केलेली लिखीत राज्य घटना. हे महान कार्य त्यांच्या समाज परिवर्तनाची साक्ष देते. घटनेच्या माध्यमातून 85% लोकांना त्यांचे विशेष अधिकार मिळावे म्हणून घटनेत काही विशेष कलमांची सोय केली. हिंदू कोड बिल मांडून स्त्री उध्दाराचा जाहिरनामा सादर केला. त्यांना वारसा हक्क मिळवून दिला आणि प्रसंगी मंत्रीपदाचा राजीनामाही दिला.[15]

दारिद्रय आणि मानसिक गुलामगिरी कामयची नष्ट व्हावी यासाठी जगाच्या इतिहासातील सर्वात मोठे बंड केले. अगदीच खालच्या पातळीवर सांस्कृतिक जीवन जगणाऱ्या समाजाला इतर समाजाच्या पातळीवर आणून बसविले जात नाही तोपर्यंत देशाच्या सांस्कृतिक विकासाची वाटचाल योग्य दिशेने होाार नाही, याची त्यांना जाणिव पूर्णतः झालेली होती. नुसत्या भौतिक सुविधा किंवा संधी मिळवून देवून एखाद्या समाजाला तात्पुरते भौतिक स्थैर्य मिळवून देता येईल परंतू त्याच्या जोडीने त्याला जर सांस्कृतिक प्रतिष्ठा मिळाली नाही तर ते भौतिक स्थैर्य कुचकामी ठरते.

दलित समाज (अस्पृश्य) हा केवळ आर्थिक कारणांमुळे दलित किंवा शोषित राहिलेला नाही तर त्याच्या या वर्तमान अवस्थेस फार मोठी सांस्कृतिक परपंरा आहे. ती परंपरा ज्या धर्माने व धर्मशास्त्राने लादली त्यालाच कायमचे सोडण्याचा निर्धार केला. येवला, नाशिकला, 13 ऑक्टो. 1935 च्या सभेत तसे जाहीरही केले आणि 14 ऑक्टोबर 1956 ला नागपूरच्या पवित्र नागभूमीवर आपल्या समाजबांधवा समवेत सामुहीक

https://doi.org/10.69758/GIMRJ/25040401V13P0013

धर्मांतर केले. जागतिक शांतीदूत तथागत भगवान बुध्दाच्या चरणी ते सहकुटूंब लिन झाले. या घटनेस संपूर्ण बौध्द जगाने आणि बौध्द विचारांवर विश्वास व श्रध्दा असणाऱ्यांनी साधुकार दिला. राजा सम्राट अशोकानंतरचे जगाच्या इतिहासतले सर्वात मोठे सामुहिक धर्मांतर होते.[16]

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विचार म्हणजे झोपडीत राहणाऱ्या माणसाचे दु:ख प्रकट करणारा विचार होय आणि हाच त्याच्या सामाजिक विचारांचा सुवर्ण धागा आहे. म्हणून त्यांनी न्यायाच्या कल्पनेला आपल्या आचार विचारात अग्रस्थान दिले. त्यांची भारतीय लोकशाहीची विचारधारा ही निखळ भारतीय समाज चिंतनातून सुस्पष्टपणे प्रकट झालेली आहे. हे निर्वीवाद सत्य आहे की डॉ. आंबेडकर हे खऱ्या अर्थाने समाज प्रर्वतक युग पुरुष होते.

**संदर्भ :**

1 – लोणारे, पुरण (2022), बहुआयामी युगप्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नागपूर, लोटस ॲन्ड कोब्रा पब्लीशींग हाऊस, पृष्ठ 41–42.
2 – उपरोक्त
3 – उपरोक्त
4 – उपरोक्त, पृष्ठ 42–43.
5 – उपरोक्त, पृष्ठ 43.
6 – उपरोक्त, पृष्ठ 43.
7 – उपरोक्त, पृष्ठ 43.
8 – मेश्राम, प्रदीप (2023), चौदावे रत्न : भिवा ते डॉ. भिमराव आंबेडकर : एक संघर्षयात्रेची प्रवासगाथा, नागपूर, रवी ऑफसेट वर्क्स, पृष्ठ 24.
9 – उपरोक्त, पृष्ठ 39.
10 – डोहणे, रत्नपाल, (2021), डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक तत्वज्ञान, नागपूर, लोटस ॲन्ड कोब्रा पब्लीशींग हाऊस , पृष्ठ 27.
11 – उपरोक्त, पृष्ठ 27 – 28.
12 – Keer, Dhananjay, (2018), Babasaheb Ambedkar : Life and Mission, Mumbai, Papular Prakashan, P. 204
13 – मेश्राम, प्रदीप (2023), चौदावे रत्न : भिवा ते डॉ. भिमराव आंबेडकर : एक संघर्षयात्रेची प्रवासगाथा, नागपूर, रवी ऑफसेट वर्क्स, पृष्ठ 72, 80.
14 – उपरोक्त, पृष्ठ 16 – 17.
15 – उपरोक्त, पृष्ठ 90.
16 – Keer, Dhananjay, (2018), Babasaheb Ambedkar : Life and Mission, Mumbai, Papular Prakashan, P. 510